# University of Mumbai

क्र.शिनिमावि(विशि)/आयसीडी/२०१६–१७/१४९२

परिपत्रक:—

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय व प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय यांना कळविण्यात येते की, प्रभारी ग्रंथपाल, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय यांनी त्यांचे पत्र क्र. जेएनएल/१९१७/२०१६ दि. २७/१२/२०१६ अन्वये विद्यापीठ प्रशासनास रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद यांच्या १७/०९/२०१६ च्या निवेदनातील मागणी क्र. १६ च्या अनुषंगांने असे कळविले आहे की, मुंबई विद्यापीठाच्या राजाभाई टॉवर ग्रंथालय, फोर्ट व जवाहरलाल नेहरू ग्रंथालय, कलिना येथे एकून सद्यस्थितीत ७,७०,३६४ पुस्तके उपलब्ध आहेत व विद्यापीठ ग्रंथालयात पुस्तकांची खरेदी विविध विभागाप्रमुख यांनी शिफारस केल्याप्रमाणे होते, अभ्यासक्रमाला लागणारी कोणती पुस्तके कमी आहेत याची माहिती विभागप्रमुखाकडून उपलब्ध झाल्यास विनाविलंब पुस्तके खरेदी केले जातील.

या अनुषंगाने, आपणांस सुचित करण्यात येते की, संबंधित विभागातील अभ्यासक्रमाला लागणारी कोणती पुस्तके कमी आहेत याबाबतची माहिती विभागाप्रमुख यांचे कडून प्रभारी ग्रंथपाल, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय यांना त्वरीत दिल्यास अभ्यासक्रमाला लागणारी अधिकची पुस्तके विनाविलंब खरेदी करणे प्रभारी ग्रंथपाल यांना सोयीचे होईल व जेणेकरून सदरची पुस्तके विद्यापीठामार्फत विद्यार्थांना अध्यापनास उपलब्ध करून देता येतील.

१५/२/१७

(डॉ.एम.ए.खान)
कुलसचिव

मुंबई — ४०० ०३२
१५ फेब्रुवारी, २०१७

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय व ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय.

माहितीसाठी रवाना:-

१. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव
२. कुलसचिवांचे स्वीय सहायक
३. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ
४. वित्त व लेखा आधिकारी
५. जनसंपर्क अधिकारी

१५/२/१७

(डॉ.एम.ए.खान)
कुलसचिव